## निशाणी क्र.४१ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व प्रतिवादींनी अर्जास दिलेले म्हणणे वाचले. वादीतर्फे वकील श्री. सलील मेहता व प्रतिवादी तर्फे वकील श्री. राकेश गांधी यांचा युक्तिवाद ऐकला.

०३. वादीचा युक्तीवाद की, प्रस्तुत दाव्याने, प्रतिवादीने वादीची मानहाणी व बदनामी केल्याकारणे नुकसान भरपाई मिळणेकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केला. परंतु दाव्यामध्ये टंकलिखित चुकीमुळे प्रतिवादी क्र. १ चे नाव पंकेश बळीराम दायते ऐवजी पंकज बळीराम दायते असे टंकलिखित झाले. सदरची चुक ही अलीकडे लक्षात आली असता प्रस्तुत दुरुस्ती अर्ज दाखल करणेस भाग पडले. वादीचे कथन की, प्रस्तावित दुरुस्ती किरकोळ स्वरुपाची आहे. प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी दिल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही. सबब अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली.

०४. प्रतिवादी यांनी अर्जास हरकत घेवून वादीने प्रस्तावित दुरुस्तीस झालेला विलंबाची कारणे न दिल्याने अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती केली.

०५. उभयपक्षातर्फे करण्यात आलेल्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. वादीचे कथन लक्षात घेता प्रस्तावित दुरुस्तीने वादी

हे केवळ प्रतिवादी क्र. १ च्या नावामध्ये झालेली टंकलिखित चुक दुरुस्त करु पाहत आहे. सदरची प्रस्तावित दुरुस्ती ही निश्चितच किरकोळ स्वरुपाची आहे. प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट भविष्यात उद्भवणा–या गुंतागुंती टळणार आहे. एकुणच वादीने दाव्यात प्रस्तावित दुरुस्तीची केलेली प्रार्थना ही प्रामाणिक असल्याचे दिसुन येते. सदर चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज न्याय हितास्तव मंजूर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदविण्यात येतो. परिणामी, खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेपर्यत मागणीप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याचे आदेशित करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड

महाड
दिनांक २४/०१/२०२४